**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# नागरीकांची सनद

**प्रस्तावना**

शिल्प कारागिर प्रशिक्षण ( औद्योगिक प्रशिक्षण संस्था योजना ) भारत सरकारने १९५० साली सुरु केली व १९५६ साली राज्य शासनास अंमलबजावणीसाठी हस्तांतरित करण्यांत आली. औद्योगिक प्रशिक्षणाद्वारे कारखान्यांना लागणारे कुशल कारागीर तयार करण्यांत येतात. त्याचबरोबर युवकांना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेले कौशल्ये निर्माण करण्यांत येतात. **जे विद्यार्थी पदवी किंवा पदविका अभ्यासक्रमांत एकतर कमी गुण असल्यामुळे किंवा आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे** प्रवेश घेवू शकत नाहीत. असे विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेतात.

सध्याच्या मुक्त बाजारपेठ व जागतिकीकरणामुळे कुशल कारागीरांना मोठया प्रमाणात मागणी असून त्यांना मिळणा-या सरासरी वेतनांतसुध्दा चांगलीच वाढ झालेली आहे. सद्य:स्थितीत राज्यात **इ.१० वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ०१ वर्ष व ०२ वर्ष कालावधीचे ७९ अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी** या योजनेतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता औद्योगिक कारखान्यांत एक ते दोन वर्ष मुदतीचे शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत प्रशिक्षण दिले जाते.

शासनाने उद्योग क्षेत्रात मोठया प्रमाणांत होणारी गुंतवणूक लक्षात घेता, मागील तीन वर्षात सतत या योजनेसाठी वाढीव तरतूद केलेली आहे. त्यामुळे कमकुवत गरीब विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाच्या अधिक चांगल्या सोई उपलब्ध होत आहेत.

सद्य:स्थितीत राज्यातील ३५८ तालुक्यात ४१७ शासकीय व **४६४** खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु असून त्यांची एकूण प्रवेशक्षमता १३६३८६ इतकी आहे.

**विभागाची सर्वसामान्य उद्दिष्टे**

व्यवसाय शिक्षणाचे महत्व ओळखून व्यवसाय शिक्षणाच्या विविध योजना राज्यात राबविणे, उच्च शिक्षणाकडे जाणा-या युवकांचा लोंढा व्यवसाय शिक्षणाकडे वळवून बेरोजगारीवर मात करणे व निरुपयोगी शिक्षणावर होणारा खर्च कमी करणे तसेच राज्यातील महिला मागासवर्गीय समाज, अपंग या सर्वांना व्यवसाय शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करुन देणे, राज्यातील उद्योग धंद्याना लागणारे कुशल मनुष्यबळ प्रशिक्षित करुन त्याचा सातत्याने पुरवठा करणे व प्रगत तंत्रज्ञानाला सामोरे जाण्यासाठी कामगारांना अद्यावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे.

**रचना**

व्यवसाय शिक्षणाच्या विविध योजना तालुका व जिल्हा स्तरावर राबविण्यांकरिता संचालनालयाकडे राज्य स्तरावर संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण) यांचे कार्यालय असून संचालनालयाच्या स्तरावर विविध प्रशिक्षण योजनांच्या धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यांत येतात. तसेच तालुका तथा जिल्हा स्तरावर ज्या विविध योजना राबविण्यांत येतात त्यांचे पर्यवेक्षण आणि संनियंत्रण करण्याकरिता प्रादेशिक स्तरावर सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची कार्यालये आहेत. जिल्हास्तरावर या योजनांचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करण्यांकरिता जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची कार्यालये आहेत. संस्थास्तरावर या योजनांची अंमलबजावणी व पर्यवेक्षण संस्था प्रमुख करतात.

## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत पुरविण्यांत येणा-या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ठ ०२ मध्ये सादर करण्यांत आलेले आहे.

## नियम / शासन निर्णय

या विभागाच्या संबंधित नियम अथवा महत्वाचे शासन निर्णय www.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या नियम, सूचना तथा शासन निर्णयाची माहिती वरील संकेतस्थळावर अद्ययावत करण्यांत येते.

## गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी असल्यास त्या संबंधीचे परिच्छेद ०२ मध्ये नमूद केलेल्या अधिका-यांकडे तक्रारी नोंदविता येतील.

## जनसामान्यांकडून सूचना

सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्या त्या वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमी सहकार्य करेल.

## नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय सनदेची अंमलबजावणी करण्यांस कटिबध्द आहे. संचालनालयाच्या अधिपत्याखालील येणा-या सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्यांची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्वक वागणूक देण्यांची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांची राहील.

परिशिष्ठ -२

कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यासनाकडून पुरविण्यांत येणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी ( दालन क्रमांक व दूरध्वनी / विस्तार क्रमांक ) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांचेकडे तक्रार करता येईल तो अधिकारी ( दालन क्रमांक, दुरध्वनी / विस्तारीत क्रमांक ) |
|---|---|---|---|---|
| ०७ | **शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना-** शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना, औद्योगिक आस्थापनांना कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे व युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराकरिता सक्षम बनविणे हे या योजनेचे मुख्य उदिृष्ट आहे. संचालनालयांलतर्गत राज्यात ४१७ शासकीय औ.प्र.संस्था व ४६४ खाजगी औ. प्र. संस्था कार्यरत आहेत. त्यांची एकूण प्रवेश क्षमता १,३६३८६ इतकी आहे. सदर औ.प्र.संस्थांमध्ये ७९ प्रकारच्या अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी व्यवसाय अभ्यासक्रमामधून प्रशिक्षण घेत असून अंदाजित ९०००० प्रशिक्षणार्थी उत्तीर्ण होवून बाहेर पडतात.<br>उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून विविध खाजगी औद्योगिक आस्थापनामधे सामावून घेतले जाते. शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण प्राप्त केल्यानंतर सदरचे उमेदवार हे कुशल कारागीर म्हणून विविध आस्थापनांमध्ये किंवा | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसात निकाली काढण्यांत येईल अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांचे आत व दुस-या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेवून | उपसंचालक<br>सहा.संचालक(तां)<br>अधीक्षक (तां)<br>( पहिला मजला )<br>( नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक<br>२६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक<br>१००३/१२०१/१२०३<br>तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | प्रसंचालक<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय<br>( चौथा मजला )<br>(नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक<br>२६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक<br>४००१. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | स्वयंरोजगार करुन रोजगारक्षम बनतात.<br>ऑगस्ट २०१३ पासून गुणवत्ता व सामाजिक आरक्षणावर वर आधारित केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे.<br>औ.प्र.संस्थेतील प्रवेशित एकूण प्रशिक्षणार्थ्यांपैकी (अनुसुचि जमातीतील विद्यार्थी वगळून) आर्थिक दृष्टया मागास असलेल्या ५० टक्के प्रशिक्षणार्थ्यांना रु.४०/- दरमहा या दराने विद्यावेतन प्रदान करण्यात येत असते. तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रु.२०/- अधिकचे विद्यावेतन समाजकल्याण विभागाकडून प्रदान करण्यांत येत असून मागासवर्गीय प्रशिक्षणर्थ्यांना असे एकूण रु.६०/- दरमहा विद्यावेतन प्रदान करण्यांत येते. | कार्यवाही करण्यांत येईल. | | |
| ०७ | **आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणांचे सार्वत्रिकीकरण करणे** - २८ शासकीय आश्रमशाळांचे रुपांतर व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरमध्ये करण्याची योजना देशात प्रथमच राबविण्यांत आली. याद्वारे ८ वी व १० वी दरम्यान तांत्रिक शिक्षण व तद्नंतर आयटीआयच्या प्रशिक्षणाची सोय आश्रमशाळेतच करण्यात आली आहे. याकरिता सन २००४ मध्ये आदिवासी उमेदवारांसाठी व्यावसाय शिक्षणाच्या व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी रोजगाराभिमुख व्यावसाय शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे या अंतर्गत १२ योजना राबविण्याबाबतचा | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्रमांक ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती ४ दिवसात निकाली काढण्यांत येईल अन्य विभागाशी संबंधित | उपसंचालक<br>सहाय्यक संचालक (तां)<br>अधिक्षक(तां)<br>( पहिलामजला )<br>( नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक<br>विस्तारीत क्रमांक १००३/१२०१/१२०३<br>तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | प्र.संचालक<br>(व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,<br>( चौथा मजला )<br>(नवीन इमारत )<br>दूरध्वनी क्रमांक २६२०६०३/६०४<br>विस्तारीत क्रमांक ४००१ |